# चारोळ्या - भाग ४०

ऐसी अक्षरे यावी
मुखी, या देवा
भक्तिभाव तुझा
त्यातुनी झरावा.

देवाला मी
दिन रात भजतो, पण
मला कळत नाही, तो
नेमकं मलाच का विसरतो?

श्रध्दा आणि सबूरी
ठेवा जपून अंतरी
येईल तीच कामी
तुम्हा जन्मजन्मांतरी.

आनंदाने हसत रहा
आनंदाने जगत रहा
माझ्यासंगे गात रहा
सतत तुम्ही हसत रहा.

**- पद्माकर चित्रे**

**('मी न माझा' या चारोळीसंग्रहातून)**